The Bodwad Sarv. Co-op Education Society Ltd. Bodwad

# Arts, Commerce and Science College, Bodwad.

## Dist. Jalgaon

NAAC Re-accredited with "B" Grade




# Institutional Distinctiveness

## 2021-22

# Vision of Institute

Vision of Institute

Our institutional vision for growing minds is,

***"To be a dedicated educational institution that prepares learners from rural backgrounds for productive careers by providing them with a student-centered practically beneficial quality learning experience."***

Performance of the Institution in one area distinctive to its priority and thrust in the field of social and educational services towards local citizens, highlighted in work of some of the departments/ committees of the institution. Our institute has taken special efforts in providing social services for welfare of local citizens and our students in the field of environmental, physical as well as mental well-being. The National service scheme unit and student development center, has taken appreciable efforts for the all-round development of local surrounding and our students. The following were the initiatives have been taken likewise-

1. Helping fund for Flood affected peoples of Konkan.
2. Kavyatri Bahinabai Gyan Varg Mohim
3. Fit India Run Mohim
4. Holy waste decomposition program
5. Visit at orphanage.

Professor Arvind Chaudhari
Principal

**Photos**

**Helping fund for Flood affected peoples of Konkan.**








**माणुसकी** • रासेयोचा पुढाकार, रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता फंडमध्ये देणार

# पूरग्रस्तांसाठी मदतफेरी, लॉकडाउनमुळे अडचणीत असूनही बोदवडचा खारीचा वाटा

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी बोदवडमध्ये पूरग्रस्तांसाठी मदतफेरी काढली. त्यास शहरात अनेकांनी प्रतिसाद दिला.

**प्रतिनिधी** | बोदवड

बोदवड येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील रासेयो एककाने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी बोदवड शहरात मदतफेरी काढली. त्यात ८ हजार ३५० रुपये जमा झाले. कोकण, पश्चिम महाराष्ट्रातील आपदग्रस्तांच्या मदतीसाठी ही रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीत पाठवण्यात येईल.

प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी यांनी स्वत: मदत करून या फेरीला सुरूवात केली. यानंतर महाविद्यालयापासून शहरातील गांधी चौक, नाडगाव रोड, मलकापूर रोड या प्रमुख मार्गावरून पुन्हा महाविद्यालयात फेरीचा समारोप झाला. यादरम्यान लहानमोठे दुकानदार, व्यावसायिक व ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने खारीचा वाटा उचलला. एकूण ८ हजार ३५० रुपये जमा झाले. ही रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीत वर्ग करण्यात येईल. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.डॉ.विनोद चौधरी, प्रा.डॉ.किशोर पाठक, प्रा.डॉ.अजय पाटील, प्रा. हेमलता कोटेचा, प्रा.डॉ.रुपेश मोरे, प्रा.नितेश सावदेकर, प्रा.डॉ.ईश्वर म्हसलेकर, प्रा. डॉ.रुपाली तायडे, प्रा.कांचन दमाडे, प्रा.डॉ.रत्ना जवरास, प्रा.दिव्या लोढा, कार्यालयीन अधीक्षक बाबुराव हिवराये, माजी उपप्राचार्य डी.एस. पाटील व कर्मचारी उपस्थित होते. मदतफेरीच्या आयोजनासाठी रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.अनिल बारी, प्रा.डॉ.माधव वराडे, प्रा. डॉ. वंदना बडगुजर यांच्यासह अजमल पवार, अविनाश पांडव, आदित्य माळी, भाग्यश्री पाटील, अंजली बाविस्कर, स्वाती पाटील, माधुरी बडगुजर, अंकिता पाटील, दीक्षा वाघ, देवयानी बोंडे, पूजा इंगळे, समृद्धी सोनटक्के, सचिन बारबुडे यांनी सहकार्य केले.

**मदत ठरेल लाख मोलाची**

कोविडमुळे शहरातील दुकान मालक, हातगाडी चालक, इतर व्यावसायिकांना मोठा आर्थिक फटका बसला. तरीही त्यांनी पूरग्रस्तांच्या मदतीत योगदान दिल्याचे गौरवोद्गार कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.अनिल बारी यांनी काढले. तर सद्याची परिस्थिती भयावह आहे. आपत्तीग्रस्तांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मदत करणे क्रमप्राप्त आहे, प्राचार्य अरविंद चौधरी यांनी सांगितले.

## यावल शहरातून टायगर ग्रुपने पाठवली मदत

पूरग्रस्तांसाठी जमा केलेल्या साहित्याचे पॅकिंग करताना ग्रुपचे सदस्य.

**यावल** । शहरातील टायगर ग्रुपने कोकणासह पश्चिम महाराष्ट्रातील पूरग्रस्तांना मदत पाठवली. त्यासाठी ग्रुपकडून गेल्या तीन दिवसांपासून मदत संकलन सुरू होते. त्यात जीवनावश्यक वस्तूंसह इतर साहित्याचा समावेश आहे.

टायगर ग्रुपचे राष्ट्रीय अध्यक्ष पैलवान तानाजी जाधव, टायगर ग्रुप खान्देश अध्यक्ष ऋषिकेश भांडारकर व स्थानिक पदाधिकारी तथा नगरसेवक डॉ. कुंदन फेगडे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातून मदतनिधी संकलित करण्यात आला. संकलित साहित्य शहरातील महाजन गल्लीतील श्री विठ्ठल रुखमाई मंदिरात एकत्र करण्यात आले. येथे ग्रुपने २०० जीवनावश्यक किटचे व्यवस्थित पॅकिंग केले. सोबत कपडे आणी ६५ पाणी बोटलचे बॉक्स असे साहित्य पुरग्रस्तांना पाठवण्यात आले. यासाठी ग्रुपचे पदाधिकारी, डॉ. कुंदन फेगडे, सदस्य उज्वल कानडे, भूषण फेगडे, निर्मल चोपडे, रितेश बारी, सागर इंगळे, मोरेश्वर फेगड, मनोज बारी, जयवंत माळी, अनिकेत सोरटे, विलास चौधरी, हितू फेगडे, संजय फेगडे, सिद्धांत घारू, कोमल इंगळे, भूषण नेमाडे, सागर चौधरी, गल्लू नेमाडे, जुगल घारू आदींनी मेहनत घेतली. ग्रुपने राबवलेल्या या उपक्रमाचे अनेकांनी कौतुक केले.

## Kavyatri Bahinabai Gyan Varg Mohim



**उपक्रम** • बोदवड महाविद्यालयाची कवयित्री बहिणाबाई ज्ञानवर्ग मोहीम

# ग्रामीण भागामधील विद्यार्थ्यांसाठी रासेयोचे स्वयंसेवक बनले शिक्षक

**प्रतिनिधी** | बोदवड

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकाकातर्फे, शुक्रवारी (दि.६) कवयित्री बहिणाबाई ज्ञान वर्ग मोहिमेला उत्साहात सुरुवात झाली. या उपक्रमात रासेयो स्वयंसेवक ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना अध्यापन करत आहेत.

कोरोनाने राज्यात थैमान घातले आहे. या कालावधीत संस्थेचे अध्यक्ष मिठुलाल अग्रवाल, सर्व संस्था पदाधिकारी, प्राचार्य प्रा. अरविंद चौधरी, सर्व प्राध्यापक व प्रध्यापकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनिल बारी यांच्या मार्गदर्शनाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. काही स्वयंसेवकानी आरोग्यदूत, बेड असिस्टंट, वैद्यकीय साहित्य, निर्जंतुकीकरण, मास्क, सॅनिटाइजर, आदी निर्मितीसाठी योगदान दिलेले आहे तसेच गरजवंताला रक्तदान व प्लाझ्मादान देखील केलेले आहे. या सोबतच कोरोनामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण हे ऑनलाइन पद्धतीने होत आहे. परंतु प्राथमिक, शालेय, पूर्वमाध्यमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणात अडचणी येत आहेत. त्यामुळे महाविद्यालयातील रासेयोच्या स्वयंसेवकानी आपल्याकडे उपलब्ध असलेल्या साहित्याद्वारे, आपल्या गावात शालेय ते उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास प्रारंभ केला आहे. या ज्ञान वर्गासाठी स्वयंसेवकांनी गरजू विद्यार्थ्यांना एकत्र करत, गावातच वेगवेगळ्या विषयांचे मार्गदर्शन करून, त्यांच्या अडचणी सोडवल्या आहेत. ग्रामीण भागात कवयित्री बहिणाबाई ज्ञान वर्गाला प्रतिसाद मिळत आहे. ही मोहीम विद्यापीठच्या निर्देशानुसार चालू राहणार असल्याचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनिल बारी यांनी सांगितले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. डॉ. पंकजकुमार नन्नवरे, संस्थेचे चेअरमन मिठुलाल अग्रवाल, उपाध्यक्ष अजय जैन, सचिव विकास कोटेचा यांनी कौतुक केले.



ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना रासेयोचे स्वयंसेवक मार्गदर्शन करत आहेत.

**यांनी घेतला सहभाग**


प्राचार्य प्रा.अरविंद चौधरी, प्रा. डॉ. अनिल बारी, डॉ. माधव वराडे, प्रा. डॉ. वंदना बडगुजर, डॉ. ईश्वर म्हसलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अजमल पवार, भाग्यता पाटील, अविनाश पांडव, स्नेहा पडोळ, पूजा इंगळे, राधा तेली, नेहा अवचरे, अंजली बाविस्कर, माधुरी बडगुजर, स्वप्नाली सरताळे, पूजा जाधव यांनी सहभाग घेतला.


**आदर्श उपक्रम** ▪ *ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी विद्यापीठाने तसेच महाविद्यालयाच्या रासेयो एकत्राने उचललेले पाऊल खूप अभिनंदनीय आहे.* - **प्रा. अरविंद चौधरी,** प्राचार्य



**Fit India Run Program**







**Holy Waste Decomposition**






उपक्रम • बोदवड येथे रासेयोने केले संकलित निर्माल्याचे विघटन

# निर्माल्याचे पावित्र्य जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य : प्रा.डॉ.बारी

प्रतिनिधी | बोदवड

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बोदवड येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील रासेयो एककाने 'निर्माल्य संकलन व विघटन' हा उपक्रम राबवला. आनंदाची उधळण करणारा गणेशोत्सव साजरा करताना निर्माल्य जलसाठ्यात विसर्जित न करता उद्यान किंवा जमिनीत पुरल्यास माती सुपीक बनेल. यामुळे बाग अधिक फुलेल तसेच निर्माल्याचे पवित्र राखणे हे आपले कर्तव्य आहे, असे प्रा.डॉ.अनिल बारी यांनी स्वयंसेवकांना सांगितले.

गणेशोत्सवात भाविकांनी वाहिलेली फुले, हार, दुर्वा यांसारख्या नैसर्गिकरित्या विघटीत केल्या जाऊ शकणाऱ्या निर्माल्याचे योग्य पद्धतीने विघटन आणि त्यातून पर्यावरणाचे संवर्धन व्हावे, यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरविंद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली निर्माल्य संकलन उपक्रम राबवला. त्यासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.अनिल बारी, प्रा.डॉ.माधव वराडे, प्रा.डॉ.वंदना बडगुजर, प्रा.डॉ.ईश्वर म्हसलेकर, रासेयो स्वयंसेवक पूजा इंगळे, भाग्यता पाटील, निकिता पालवे, अंकिता पाटील, प्रेरणा महाजन, दीपाली मंगळकर यांनी आपापल्या परिसरातील सार्वजनिक मंडळे, घरगुती गणपती जवळील निर्माल्य संकलन मोहीम राबवली. या निर्माल्याचे २० सप्टेंबरला महाविद्यालयीन परिसरात नैसर्गिकरीत्या विघटन केले.

यावेळी महाविद्यालयाच्या ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.माधव वराडे यांनी यांनी संवाद साधला. गणेशोत्सवात भाविकांनी वाहिलेली फुले, हार, दूर्वा म्हणजेच निर्माल्याचे पावित्र्य राखल्याने समाधान व्यक्त केले.

बोदवड महाविद्यालयात निर्माल्याचे विघटन करताना रासेयो स्वयंसेवक.

## Visit at Orphanage

